**MAHARASHTRA STATE KHADI & VILLAGE INDUSTRIES BOARD,**
**19/21, Manohardas Street,**
**Fort, Mumbai 400 001**
**TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)**
**022-2696808 (Fax)**
**E-mail:hokvib@mskvib.org**

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१**

# ई-टेंडर निविदा संच

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई कार्यालयाकरीता आवश्यक सेवा पुरविणेबाबत.

(To be submitted online through Govt. of Maharashtra E-Tendering portal http://mahatenders.gov.in)

| | |
|---|---|
| कालावधी | ११ महिन्यांठी |
| निविदा फी | रुपये-१०,०००+ जीएसटी १८% रु १८००<br>एकुण रूपये ११,८००/- |
| एकुण पाने | ०१ ते २२ |

(Geetanjali Baviskar, IAS)
Chief executive officer
Maharashtra State Khadi & Vilage Industries Board,
Mumbai - 400 001

MAHARASHTRA STATE KHADI &
VILLAGE INDUSTRIES BOARD,
19/21, Manohardas Street,
Fort, Mumbai 400 001
TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)
022-2696808 (Fax)

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१**

## -: अनुक्रमणिका:-

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयाच्या मुख्य कार्यालय तसेच जिल्हा कार्यालयांसाठी आवश्यक सेवा पुरविणेबाबत ई-निविदा


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबइ या कायोलयास आवश्यक सेवा पुरविणेबाबत ई-निविदा संच | १ |
| २. | अनुक्रमणिका | २ |
| ३. | इ-निविदा सूचना | ३ |
| ४. | निविदा सूची आणि संपर्क तपशिल | ४ |
| ५. | निविदे विषयक ठळक माहिती | ५ |
| ६. | इ-निविदा भरणेविषयक सूचना | ६-७ |
| ७. | निविदेसोबत मुळ प्रती अपलोड करावयाच्या कागदपत्रांची यादी | ८ |
| ८. | निविदा सर्वसाधारण अटी व शर्ती | ९-१२ |
| ९. | परिशिष्ट- (अ) निविदा धारक विषयी माहिती | १३ |
| १०. | परिशिष्ट- (ब) वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र | १४ |
| ११. | परिशिष्ट (क) प्रतिज्ञापत्र (मसूदा) | १५ |
| १२. | परिशिष्ट (ड) सेवेचे स्वरुप, शैक्षणिक अर्हता इ. | १६-१७ |
| १३. | परिशिष्ट- (इ) दाखला | १८ |
| १४. | परिशिष्ट- (फ) शपथपत्र | १९ |
| १५. | प्रतिज्ञा | २० |
| १६ | प्रमाणपत्र | २१ |
| १६. | परिशिष्ट-(ग) (BILL OF QUANTITIES (BOQ)) | २२ |


(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

**MAHARASHTRA STATE KHADI & VILLAGE INDUSTRIES BOARD,**
**19/21, Manohardas Street,**
**Fort, Mumbai 400 001**
**TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)**
**022-2696808 (Fax)**

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयाच्या मुख्य कार्यालय तसेच जिल्हा कार्यालयांसाठी आवश्यक सेवा पुरविणेबाबत ई-निविदा सूचना क्रमांक १/२०२५-२०२६

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई कार्यालयाकरीता आवश्यक मनुष्यबळाची सेवा पुरविण्याकरीता पंजीकृत/नोंदणीकृत असलेल्या ठेकेदाराकडुन निविदा मागविण्यात येत आहेत. सर्व इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक व अटी व शर्ती पाहण्याकरीता व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीचा http://www.mahatenders.gov.in या portal वर नोंदणी करणे आवश्यक आहे.

| अ क्र | कामाचे वर्णन | निविदाची किमत वार्षिक अंदाजित | निविदा फॉर्मची किमत (ना परतावा) | बयाणा रक्कम | निविदा विक्री बाबत माहिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई कार्यालय व जिल्हा कार्यालयांकरिता आवश्यक सेवा (मनुष्यबळ) पुरविणे | ३,०६,६२,०६४/- १८% जीएसटी सह | रुपये-१०,०००+ जीएसटी १८% रु.१८००/- एकूण रु.११८००/- | १,५०,०००/- | दि. ११.०४.२०२५ पासून ते दि.१९.४.२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत |

## महत्वाच्या सुचना

| | |
|---|---|
| १. | संपूर्ण निविदा प्रक्रिया ही इ निवीदा द्वारे होणार असुन निविदा सुचना, अटी व शर्ती शुध्दीपत्रक इत्यादी माहिती http/www.mahaenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| २. | ई-निविदा फॉर्म विक्री सूरू होण्याचा कालावधी दि.११.०४.२०२५ सकाळी १०.०० पासुन ते दि. १९.०४.२०२५ पर्यंत. |
| ३. | निविदा ऑनलाइन भरणे(Upload) करण्याचा कालावधी दि.११.०४.२०२५ ते दि.१९.०४.२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत असेल. |
| ४. | ऑनलाइन निविदेचा तांत्रीक लिफाफा दि. २१.०४.२०२५ रोजी उघडण्यात येईल. |
| ५. | ऑनलाइन निविदेचा व्यापारी लिफाफा दि. २४.०४.२०२५ रोजी उघडण्यात येईल. |
| ६. | ई-निविदा दि.२४.०४.२०२५ रोजी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई-०१ येथे उघडण्यात येतील त्यादिवशी निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्राच्या मुळ प्रतिसह उपस्थित रहावे. काही अपरिहार्य कारणामुळे ही तारीख व वेळ बदलल्यास याबाबतची सुचना ई-निविदा प्रणालीवर देण्यात येईल किंवा कार्यालयाच्या सुचना बोर्डवर लावण्यात येईल. |
| ७. | निविदा फॉर्म शुल्क व बयाणा रक्कम ऑनलाइन स्वरुपात (Online Payment Gateway Mode) भरणे आवश्यक आहे. बयाणा रक्कम (EMD) भरणेस सुट असल्यास त्याबाचतचे सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र (As per Industry Dept. GR ०१.१२.२०१६ Para No.३.१.२.१-Annexure-८) ऑनलाईन पध्दतीने सादर करणे (to be uploaded) बंधनकारक आहे. सुट प्रमाणपत्रामध्ये ज्या कामासाठी निविदा भरण्यात येत आहे. त्या कामाचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे. E-Payment Gateway संदर्भात आवश्यक माहिती ई-निविदा वेबसाईट http://www.mahatenders gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ८. | तांत्रिक लिफाफ्यातील अटी व शर्तो पूर्ण होत नसल्यास लिफाफा क्रमांक २ वाणिज्य लिफाफा उघडण्यात येणार नाही. |
| ९. | निविदा स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांनी राखुन ठेवलेले आहे. |
| १०. | निविदेबाबत प्री बीड मिटींग दि. १६.०४.२०२५ रोजी ठिक १२.०० वाजता आयोजित करण्यात येईल. |

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- ११/०४/२०२५.

(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

MAHARASHTRA STATE KHADI &
VILLAGE INDUSTRIES BOARD,
19/21, Manohardas Street,
Fort, Mumbai 400 001
TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)
022-2696808 (Fax)

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१**

## निविदा सुची आणि संपर्क तपशिल ( आवश्यक मनुष्यबळ सेवा पुरविणेबाबत ई-निविदा)

| अ. क्र | निविदेसंबंधित प्रमुख तारखा | सुरुवात दिनांक आणि वेळ | अंतिम दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|
| १. | ऑनलाइन निविदा प्रसिध्द करणे | दि. ११.०४.२०२५ | --------- |
| २. | निविदा कागदपत्रे डाऊनलोडींग / ऑन लाईन सादरीकरण | दि. ११.०४.२०२५ | १९/०४/२०२५ सायं.५.०० वाजता. |
| ३. | तांत्रिक लिफाफा उघडण्याची तारीख | दि. २१.०४.२०२५ | --------- |
| ४. | पात्र निविदा धारकांचा आथिक लिफाफा उघडण्याची तारीख | दि. २४.०४.२०२५ | --------- |
| ५. | निविदापूर्व बैठक | दि. १६.०४.२०२५ दुपारी १२.०० वा. | --------- |
| ६. | निविदा कागदपत्रे उघडण्याचे ठिकाण | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई | --------- |

निविदा विषयक चौकशीसाठी संपर्क

१. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

सामान्य चौकशी :- ०२२-२२६१७६४१

(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

MAHARASHTRA STATE KHADI &
VILLAGE INDUSTRIES BOARD,
19/21, Manohardas Street,
Fort, Mumbai 400 001
TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)
022-2696808 (Fax)

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१**

## -: निविदेविषयक ठळक माहिती :-

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचेसाठी पंजीकृत/नोंदणीकृत सेवा पुरवठादार/ठेकेदार यांचेकडून आवश्यक सेवा पुरविण्याबाबत दोन लिफाफा तांत्रिक आणि आर्थिक पध्दतीने निविदा मागविणात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. कामाचे स्वरुप | :- | सोबत परिशिष्ट 'ड' नुसार |
| २. कामाचा कालावधी | :- | कार्यादेशानुसार ११ महिन्यांकरीता. |
| ३. निविदा शुल्क (ना परतावा) | :- | १०,००० + १८००/- (GST १८%) = रु.-११,८००/- |
| ४. निविदा उपलब्धता/स्विकृती दिनांक व वेळ | :- | दिनांक ११.०४.२०२५ ते दिनांक १९.०४.२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत<br>संकेतस्थळ :- http://mahatenders.gov.in |
| ५. निविदा बयाणा रक्कम | :- | रु.१,५०,०००/- (विना व्याजी) (Online Payment Gatevery Mode) द्वारे भरावी लागेल. सदरील बयाणा रक्कम ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ज्या निविदा धारकास निविदा मिळणार नाही. त्यांना ऑनलाईन परत करण्यात येईल. व ज्यांनी निविदा मंजूर होईल त्यांची रक्कम बिनव्याजी निविदा कालावधीत सुरक्षा अनामतीमध्ये जमा करण्यात येईल. |
| ६. निविदा उघडणं | :- | दि. २४.०४.२०२५. उघडण्यात येईल. |
| ७. सुरक्षा अनामत | :- | रु.९,२०,०००/- (रुपये नउ लाख वीस हजार मात्र) (बिना व्याजी) |

सुरक्षा अनामत कार्यादेश दिल्यापासून १५ दिवसांचे आत राष्ट्रीयकृत धनाकर्षाद्वारे भरणे आवश्यक राहील. त्याशिवाय निविदा धारकास कोणतेही देयक अदा केले जाणार नाही.

सदर आवश्यक असणाऱ्या सेवेचे स्वरुप, निविदा अटी शर्ती इत्यादीची माहिती निविदा पत्रकात उपलब्ध आहे. कामगार विषयक विविध कायद्यांतर्गत नोंदणीकृत ठेकेदारांकडून वर्ष २०२५-२६ साठी आवश्यक मनुष्यबळ सेवा पुरविण्याकरीता ई-निविदा मागविण्यात येत आहेत. परिपूर्ण भरलेल्या निविदा, निविदा सूचनेत दिलेल्या निर्देशानुसार (अपलोड) सादर करण्यात याव्यात. निविदेसंबंधित मुदतवाढ, दुरुस्ती किया सूचीमधील बद्दल इत्यादी बाबी वृत्तपत्रात जाहीर केल्या जाणार नसून त्याबाबतची माहिती उपरोल्लेखीत संकेतस्थळावरच प्रसिध्द करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

MAHARASHTRA STATE KHADI &
VILLAGE INDUSTRIES BOARD,
19/21, Manohardas Street,
Fort, Mumbai 400 001
TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)
022-2696808 (Fax)

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१**

-: ई-निविदा भरणेविषयक सूचना:-

अ. निविदेच्या प्रत्येक फलावर निविदाधारकाचे निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संमतीदर्शक संपूर्ण सही व शिक्का असणे आवश्यक आहे. कुठल्याही प्रकारची खाडाखोड, ओव्हर रायटींग आढळल्यास निविदा अपात्र समजण्यात येईल.

आ. निविदेसोबत अधिकृत साक्षांकित दस्तऐवजांच्या प्रती जोडव्यात, अपुर्ण दस्तऐवज असलेलो निविदा नाकारण्यात येईल.

इ. निविदेत नमूद केलेल्या दस्तऐंवजांव्यतिरिक्त इतर काही दस्तऐवज मागणी केल्यास ते देखील सादर करणे निविदा धारकावर बंधनकारक राहील.

ई. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई हे निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत.

उ. जी व्यक्ती अज्ञान आहे किंवा जी व्यक्ती दिवाळखोर म्हणून जाहीर झालेली आहे किंवा भारतीय दंड विधान कायद्याअंतर्गत एखाद्या गुन्ह्यात न्यायालयाने दोषी जाहीर केलेली असेल किंवा अशा प्रकारच्या गुन्हयामध्ये ती व्यक्ती नैतीक मुल्य भ्रष्ट करण्याकामी समाविष्ट असेल किंवा जी व्यक्ती गुन्हेगारी स्वरुपाच्या कामात समाविष्ट असेल किंवा काही काळा पुरती प्रतिबंधक कायद्याखाली स्थानबध्द केलेली असेल किंवा केंद्र शासन, राज्य शासन किंवा या संस्थेने त्या व्यक्तीस/संस्थेस काळ्या यादीत टाकलेले असेल अशी व्यक्ती/संस्था निविदा भरण्यास अपात्र समजण्यात यावी. अशा व्यक्तीने अथवा संस्थेने जर निविदा सादर केली तर ती कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येईल.

ऊ. मक्तेदारास/संस्थेस उक्त कामाचा मनुष्यबळ (सेवा विषयक पुरवठा) किमान ०३ वर्षाचा शासकीय, निमशासकीय, मंडळ/महामंडळे तसेच खाजगी व्यापारी संस्था येथे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक राहील.तसेच १०० पेक्षा जास्त कर्मचारी निविदा धारकाकडून इतर आस्थापनेवर कार्यरत असणे आवश्यक आहे.

ऋ. टक्केवारीनुसार सर्विस चार्जेस (सेवा आकार) चे दर नमूद करतांना प्रदानास देय असणारी सर्विस चार्जेसची मासिक रक्कम पूर्ण रुपयांत येईल याची खात्री करुनच दर नमूद करणे आवश्यक राहील.

ऌ. निविदाकाराने निविदा सादर करण्यापूर्वी उद्योग,उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. भांखस २०२१/प्र.क्र.८/उद्योग-४,दि.०७/०५/२०२१ चे अवलोकन करावे. तसेच उद्योग,उर्जा,कामगार व खनिकर्म विभागाचा किमान वेतनाची शासन अधिसुचना असाधारण क्र.११८ क्रमांक किवेअ ०४२४/प्र.क.५५/कामगार-७, दि.१२/०८/२०२४ व क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३/कामगार-८, दि.२२/०२/२०१९ चे शासन परिपत्रक यामधील कर्मचा-यांना देय असलेले भत्ते व इतर सवलती यांचे अवलोकन करुण ई निविदा सादर करावी.

ऍ. केंद्र शासनाच्या दि.०६/०१/२०२३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे विहीत केलेले सेवाशुल्क मर्यादा निविदाधारकास लागू राहील.

## Instructions for Filling of E-Tender

1. **Procedure to submit the tender :-** All eligible/interested tenderer are required to be enrolled on portal http://mahatenders.gov.in before downloading tender documents and participate in e-tendering. The vendors should submit online tencer in two bid system ie. Technical Bid and Financial Bid. (BOQ)
2. **Technical Bid :-** The technical bid shall contain the following documents. The Bidder must upload scanned copies of all these documents online as a part of technical bid. All the documents must be valid and self attested / certified by bidder. Non-submission of following requested documents may lead to rejection of offers.
3. **Financial Bid :-** The tendering authority will first open the Technical Bid documents of all bidders and after scrutinizing these documents will shortlist the Bidders who are eligible for Financial Bidding process. Otherwise the tender may be disqualified. Financial bid should be submitted online by vendor in the form of BOQ pdf format given over www.mahatender.gov.in The supplier shall fill up the column percentage formal offered by him.
4. Bidder should have valid Digital Signature Certificate (DSC) obtained from any Certifying Authorities.
5. The details about services to be provided and the terms and conditions associated therewith have been provided in the tender documents.
6. The Technical and Financial bid shall be submitted online as per the schedule.
7. The Bidders are strictly alvised to follow the dates and times allocated to each stage indicated in the time schedule. All the online activities ars time tracked and me Electronic Tendering system enforces Time-locks that ensure that no activity or transaction can take place outside the Start and End Dates and Time of the Stage as defined in the tender schedule. At the sole discretion of the Tender Authority the time schedule of the Tender stages may be extended.
8. Rate or service charges to be quoted should be mentioned at appropriate place provided in Schedule (BOQ) by the bidder, more over the rate should not be quoted anywhere else in the tender booklet as well as in the blank pages.
9. The Maharashtra State Khadi & Vilaage Industries Board reserves the right to decide whether to open or not open the financial bid of the supplier and objection of any supplier shal not be entertained on any ground what so ever it may be regarding this.
10. No Bid shall be accepted without payment by online earnest money deposit and cost of tender.
11. The MSKVIB is not to bind to accept lowest tenders and reserve the right to accept/cancel any or all tenders without assigning any reason thereof.

(Geetanjali Baviskar, IAS)
Chief executive officer
Maharashtra State Khadi & Village Industries Board,
Mumbai - 400 001

MAHARASHTRA STATE KHADI & VILLAGE INDUSTRIES BOARD,
19/21, Manohardas Street,
Fort, Mumbai 400 001
TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)
022-2696808 (Fax)

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१

-: पात्रते विषयक निविदे सोबत मूळ प्रती अपलोड करावयाच्या कागदपत्रांची यादी :-
LIST OF DOCUMENTS TO BE UPLOADED

| Sr.No. | Name of Document | अशी खुण करा |
|---|---|---|
| १. | निविदा शुल्क रक्कम रुपये ११,८००/- (जीएसटीसह) विना परतावा ऑनलाइन (इ) बँकींगद्वारे जमा केल्याची पावती सादर करणे अनिवार्य राहील, अन्यथा निविदा नाकारण्यात येईल. सुट असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील. सुट प्रमाणपत्रामध्ये ज्या कामासाठी निविदा भरण्यात येत आहे. त्या कामाचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे. | |
| २. | निविदेसोबत बयाणा/इसारा रक्कम रु.१,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष पन्नस हजार मात्र) (विना व्याजी) इंटरनेट बँकींगद्वारे जमा केल्याची पावती सादर करणे अनिवार्य राहील, अन्यथा निविदा नाकारण्यात येईल. सुट असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील. | |
| ३. | पार्टनरशिप डीड (भागीदारी असल्यास)/Memorandum & Articals of Association (प्रायव्हेट कंपनी असल्यास)घटनेची प्रत(सहकारी संस्था असल्यास)जोडणे आवश्यक आहे. | |
| ४. | नोदणीकृत मुखत्यारपत्र केले असल्यास त्याची प्रत जोडावी. | |
| ५. | शॉप्स अँण्ड इस्टॅब्लीशमेंट कायद्याखाली नोदणी केल्याचे प्रमाणपत्र. (नोदणी अद्ययावत नुतणीकरण केलेले असावे) | |
| ६. | पॅन कार्ड व ISO.10667-2 : 2020 प्रमाणपत्र | |
| ७. | चालु वर्षाचा आयकर भरल्याचा पुरावा जोडावा (२०२३-२४) तसेच मागील तीन वर्षांचे म्हणजे आकारणी वर्ष २०२०-२१,२०२१-२२ व २०२२-२३ चे आयकर रिटर्नस् (अनिवार्य) | |
| ८. | व्यवसाय कर नोदणी प्रमाणपत्र. | |
| ९. | पी.एफ कायद्याअंतर्गत नोदणी प्रमाणपत्र. | |
| १०. | ESIC नोदणी प्रमाणपत्र. | |
| ११. | वैध GSTN प्रमाणपत्राची प्रत. | |
| १२. | शासकीय तसेच अशासकीय संस्थांमध्ये अशा प्रकारची सेवा पुरविल्याचा तपशिल टिप-काम मिळाल्याचा आदेश पत्राचा आदेश क्र.,दिनांक,कामगारांची संख्या,कामाचा तपशिल,कामाचे एकूण मुल्य व कामाचा कालावधी इत्यादींचा उल्लेख असावा. त्या ठिकाणाचे काम समाधानकारक असावे याकरीता स्वतंत्र तपशिल जोडावा. | |
| १३. | परिशिष्ट (अ) निविदा धारक विषयक माहिती. (पृष्ठ क्रमांक १४ ते १५ नुसार) | |
| १४. | परिशिष्ट (ब) निविदाधारकाच्या/संस्थेच्या मागील तीन वर्षात प्रति वार्षिक उलाढाल रुपये १,००,००,०००/-असल्याचे चार्टर्ड अकौटंट यांनी नुकतेच निर्गमित केलेले प्रमाणपत्र जोडावे. | |
| १५. | परिशिष्ट(क)निविदेच्या पृष्ठ क्र.१७ वरील मसूदा साधं ५००/-मुद्रांक पेपरवर स्वाक्षरीकृत प्रतिज्ञापत्र जोडावे. | |
| १६. | परिशिष्ट (इ) पृष्ठ क्रमांक १९ नुसार प्रतिज्ञा पत्र, हमीपत्र जोडावे. | |
| १७. | परिशिष्ट (फ) शपथपत्र पाठ क्रमांक २० नुसार जोडावे. | |

वर नमूद केलेली अ.क्र.१ ते १७ ची माहिती क्रमानुसारच पीडीएफ स्वरुपात स्कॅन करुन जोडण्यात यावी.

टिप:- १.जोडलेल्या दस्ताऐवजांसाठी ( ) खुण करावी.

२.उपरोक्त मागविलेल्या माहिती व्यतिरिक्त अनावश्यक माहिती जोडू नये.

३.निविदेसोबत सादर केलेल्या कागद पत्रांच्या मुळ प्रती निविदा उघडण्याच्या वेळी तपासणीच्या वेळी मागविल्यास उपलब्ध करून देणे निविदाधारकास अनिवार्य राहील.

(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

MAHARASHTRA STATE KHADI &
VILLAGE INDUSTRIES BOARD,
19/21, Manohardas Street,
Fort, Mumbai 400 001
TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)
022-2696808 (Fax)

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१

## -: निविदा सर्वसाधारण अटी व शर्ती :-

अ. **निविदा सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१. महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या पोर्टलवरून विहित मुदतीत भरलेल्या निविदाच विचारात घेण्यात येतील.

२. ज्या निविदाधारकांची/संस्थेची निविदा मंजूर होईल अशा निविदाधारक/संस्था यांनी ५००/- रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर स्वखर्चाने कार्यादेश मिळाल्यापासून ०८ दिवसांच्या आत करारनामा करणे बंधनकारक राहील. तसेच सुरक्षा अनामत रु.९,२०,०००/- (अक्षरी रुपये नउ लाख वीस हजार मात्र) (विना व्याजी) कार्यादेश दिल्यानंतर आठ दिवसांच्या आत धनादेश/डिडि द्वारे कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील. त्या शिवाय निविदा धारकास उपलब्ध करुण दिलेल्या कोणतेही सेवाचे देयक अदा केले जाणार नाही.

३. आवश्यक सेवा पुरवठादाराची अनामत रक्कम ठेका संपल्यानंतर पुरवठादार संस्थेच्या प्राधिकाऱ्यांकडून ना देय प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच परत करण्यात येईल. सदर रक्कम बिनव्याजी राहील.

४. ठेकेदाराने मासिक बिल प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेच्या आंत सादर करणे बंधनकारक राहील. सदर देयकावर लागू असलेल्या दराने आयकराची कपात करूनच देयक मंजूर केले जाईल.

५. निविदेतील दर हे किमान वेतन कायद्यानुसार व इतर कामगार कायद्यानुसार सादर करावे सदर पदांसाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांनी मंजूर दर निश्चीत केलेले आहेत त्यानुसार अदा करणे आवश्यक राहील.

६. निविदेत नमूद नमूना प्रपत्रात आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार मंडळास राहील. तसेच अटी व शर्तीमध्ये परिस्थीतीनुसार बदल करण्याचे अधिकारही मंडळास राहतील. सदर निविदा कुठलीही सूचना न देता रद्द करण्याचा अधिकार मंडळास राहील.

७. निविदेतील नमूद दर हे टक्केवारीच्या स्वरुपात असून ते सर्व करांसहीत दर्शविण्यात यावेत तसेच त्यावरील सध्या अनुज्ञेय जीएसटी स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावेत. वाणिज्यीक लिफाफा उघडतांना बील ऑफ क्वांटीटी (BOQ) मधील स्तंभ क्र.४ (Percentage Rate) मध्ये दिलेले निव्वळ दर हे एल-१ ठरवितांना विचारात घेण्यात येतील.

८. पुरवठा मनुष्यबळ मानधन पदाच्या टक्केवारीनुसार सर्विस चार्जेसचे दर नमूद करतांना प्रदानास देय असणारी सर्विस चार्जेसची मासिक रक्कम पूर्ण रुपयांत येईल याची खात्री करुनच सेवाशुल्क दर नमुद करणे आवश्यक राहील.

९. ई-निविदा सादर करतांना निविदा प्रक्रियेतील कुठल्याही अटी व शर्तीचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर निविदाधारकांस तत्क्षणी निविदा प्रक्रीयेतून बाद ठरविण्यात येईल.

१०. सेवा पुरवठादार हा मुंबई शहर हद्दीबाहेरचा असल्यास त्याला मुंबई शहर हद्दीत आपला प्रतिनिधी नेमावा लागेल. वेळोवेळी येणाऱ्या तक्रारी, अडचणी इत्यादीवर कार्यवाही करण्याची जबाबदारी त्या प्रतिनिधीची असेल. याबाबतचा पत्रव्यवहार मंडळ त्या प्रतिनिधीबरोबर करेल आणि तो सर्व पत्रव्यवहार निविदाधारकावर बंधनकारक असेल. प्रतिनिधी नियुक्तीचे मुखत्यार पत्र मंडळास सादर करावं लागेल.

११. सदर सेवे अंतर्गत कामगारांची संख्या कमी /अधिक करणेचा संपूर्ण अधिकार मंडळास राहील.

१२. निविदेतील अटी व शर्ती वाचल्या असून त्या मान्य असल्याबाबत व नुकसान भरपाई बाबतचा दाखला परिशिष्ट नुसार पृष्ठ क्रमांक १९ प्रमाणे रु.५००/- च्या स्टॅम्पपेपरवार नोंदणीकृत करुन निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे.

१३. निविदेतील पृष्ठ १७ प्रमाणे (परिशिष्ट क) प्रतिज्ञापत्र रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत करुन निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे.

१४. ठेकदाराने सेवेत दिलेल्या कामात प्रचलित किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतनाची रक्कम आवश्यक ती EPF, इत्यादी कपात करुन बँक खात्यामार्फत वेतन प्रथमतः करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील व त्याबाबतचा दरमहा परावा (बँक खाते उतारा) सादर करावा लागेल. तसेच सर्व सेवा देणाऱ्या कामगारांचे वेतन सध्या लागू

असलेल्या किमान वेतन दरानुसार अदा केले असल्याचे मुळ मुळ ठेकेदाराचे किंवा प्रतिज्ञा बंधपत्रात नमूद केल्याप्रमाणे प्रतिनिधीचे पत्र देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील. व तसा पुरावा सादर केल्यानंतर प्रत्येक महिन्याचे देयक अदा केले जाईल.

१५. ठेकेदाराकडून पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळाकरीता त्यांनी केलेल्या कामकाजाच्या दिवसानुसार महिन्यासाठी पुरवठादाराने संबंधित कर्मचाऱ्याचे करारानुसार वेतन व भत्ते (मूळ वेतन, विशेष महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, इतर भत्ते, भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना/ कर्मचारी नुकसान भरपाई, व्यावसायिक कर, बोनस, कामगार कल्याण निधी, सुट्ट्यांच्या दिवशी केलेले काम या अनुज्ञयेतेनुसार बँक खात्यामध्ये जमा करावेत. तसेच सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनातुन वैधानिक देणी /वजावटी कापून घेवून त्या संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वैधानिक देणी जमा करण्याच्या खात्यांमध्ये (PF. ESIS, PT accounts) जमा कराव्यात. तदनंतर ठेकेदाराने एकुण प्रदान केलेले वेतन, सेवाशुल्क व अन्य करांसह देयक (१.एकत्रित देयक २. नाव व पदनामामह कर्मचाऱ्यांचा वेतन व वैधानिक देण्यांसह तपशील ३. उपस्थितीबाबत तपशील ४. भविष्य निर्वाह निधी. राज्य कामगार विमा योजना/कर्मचारी नुकसान भरपाई व व्यावसायिक कर अदा केल्याच्या पावत्या ५. एकत्रित वेतनचिठ्ठ्या) या कागदपत्रासह कार्यालयास सादर करणे आवश्यक असुन त्यानुसार ठेकेदारामार्फत सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे/ पुरावे तपासून रक्कम अदायगी करण्यात येईल.

१६. मंडळाने ठरवून दिल्याप्रमाणे व वेळोवेळी केलेल्या सुचनेप्रमाणे कामे सेवा देणाऱ्या कामगारांकडून करुन घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची असून ठेकेदाराचे प्रथम कर्तव्य राहील.

१७. मंडळ कार्यालय परिसरात कोणतीही अनधिकृत घटना, संशयास्पद व्यक्ती, वस्तू, चोर किंवा संस्थेच्या मालमत्तेचे नुकसान करणारी व्यक्ती आढळून आल्यास, ठेकेदार व ठेकेदाराने सेवेकरीता उपलब्ध केलेले कामगार आवश्यकता भासल्यास त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करतील व तसे तात्काळ मंडळास कळवेल.

१८. ठेकेदाराने मनुष्यबळ / कामगारांची नेमणुक करतांना कुठल्याही परिस्थीतीत १८ वर्षा पेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त वय असलेले सेवा देणारे कामगार नेमू नयेत. सदर सेवा देणाऱ्या कामगारांची वैद्यकीय तपासणी सुध्दा नियमितपणे करून तसा अहवाल मंडळास सादर करणे बंधनकारक राहील.

## आ. कामाची वेळ व पर्यवेक्षण :-

१. मंडळाने सुचित केल्याप्रमाणे आवश्यक सेवा मनुष्यबळ पुरवठा केलेल्या ठेकेदाराकडील सेवा अंतर्गत असणाऱ्या कामगारांना मंडळातील संबंधीत विभागप्रमुख ठरवून देतील त्याप्रमाणे काम करण्याची जबाबदारी कामगारांची राहील. ठेकेदाराने प्रत्यक्ष मंडळ व परिसराची पाहणी करुन व कामाचा व्याप पाहून निविदा वित्तीय लिफाफा (Financial Bid) सादर करावा.

२. निविदाधारकास सेवा अंतर्गत कामगारांच्या हजेरीच्या नोंदीसाठी स्वखर्चाने नोंदवही ठेवणे अनिवार्य असून शक्य झाल्यास इतर अनुषंगिक संसाधनांचा वापर करणेही आवश्यक आहे.

३. सेवा पुरविणाऱ्या निविदाधारकाकडील सर्व सेवा अंतर्गत असणाऱ्या कामगारांस लागणारे ओळखपत्र, आवश्यक त्याना गणवेश निविदाधारकास पदानुसार स्वखर्चाने पुरविणे बंधनकारक राहील.

४. सेवेसाठी पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळ कामाचे तास शासकीय कार्यालयीन कामाच्या आवश्यकतेप्रमाणे ठरविण्यात येतील. त्यानुसार सेवा देणारे मनुष्यबळ हे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. ड व ड-१ एकुण ७७ मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावे लागतील. पुरवठादारांकडून पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळामध्ये आवश्यकतेप्रमाणे वाढ किंवा बदल करण्याचा हक्क मंडळ अबाधित ठेवील.

५. सेवेसाठी पुरविण्यात आलेल्या एखाद्या कामगाराने काम करतांना काही गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास व मंडळाने ठेकेदारास कळविल्यास सदर सेवा अंतर्गत असणाऱ्या कामगारास तात्काळ कामावरून कमी व त्याची त्या दिवसाची गैरहजेरी दर्शवून त्या ठिकाणी दुसरा मनुष्यबळ त्वरीत पुरविणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

६. नियुक्त ठेकेदार/संस्था व सेवा देणारे कामगार यांच्या अंतर्गत काही प्रश्न उपस्थित झाल्यास किंवा वाद निर्माण झाल्यास त्यास मंडळ जबाबदार राहणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरवठा करणाऱ्या ठेकेदाची राहील. कामासाठी कोणते व कुठले व्यक्ती लावणे हा सर्वस्वी ठेकेदाराचा प्रश्न असून त्यासाठी मंडळाचे काही एक म्हणने राहाणार नाही.

७. ठेकेदाराने सेवेसाठी कामगार नेमतांना त्याच्या पात्रतेविषयी व अनुभवा संबंधी योग्य ती तपासणी करुन व या कार्यालयाची संमती घेवुनच नियुक्ती करावी. सदर सेवे अंतर्गत कामगार गुन्हेगारी प्रवृत्तीचा /पार्श्वभुमीचा नसल्याचे खात्री करुन नियुक्ती / पुरवठा करण्यात यावा.

**दंड कर आकारणी :-**

मंडळाच्या मालमत्तेचे नुकल्यास झाल्यास तसेच संबंधित सेवा अंतर्गत असणाऱ्या कामगाराने गैरवर्तवणुक केल्यास किंवा त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्यास त्यामुळे संस्थेचे नुकसान झाल्यास त्याबाबत मंडळ वेळोवेळी वस्तुची किंमत व दंड आकारणी बाबत जो निर्णय घेईल तो निर्णय संबंधीत निविदाधारकावर ठेकेदारावर बंधनकारक राहील.

**इ. कामगार कायद्याचे पालन :-**

१. ठेकेदाराने सेवा पुरवठा करतांना सेवेअंतर्गत कामगारांच्या नेमणुकीच्या बाबतीत कुठल्याही परिस्थीतीत १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्तीची नेमणूक करू नये. विशेषतः सेवाअंतर्गत कामगाराची वैद्यकिय तपासणी सुध्दा नियमितपणे करुन तसा अहवाल मंडळास सादर करणे बंधनकारक राहील. (बालकामगार,शारीरिक दृष्ट्या अपंग, मानसिक दृष्ट्या अपंग व्यक्ती यांची नियुक्ती करू नये)

२. ठेकेदार सेवा पुरविण्यासाठी ज्या कामगारांची नियुक्ती करेल ती नियुक्ती प्रचलित वेतन कायद्याप्रमाणे करेल, तसेच त्यांना EPF, Leave Salary, मासिक सूट्टी या शासनाच्या नियमाप्रमाणे देय राहील. सदर सेवे अंतर्गत कामगारांस देण्यात येणारे वेतन व नियुक्तीच्या अटी व शर्ती त्यास मान्य असल्याबाबतचे संमती पत्र करारपत्र करून घेईल व सदर सेवे अंतर्गत कामगार मंडळाच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगणार नाही. अथवा मंडळाविरुध्द कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे अथवा न्यायालयात दाद मागणार नाही असा स्पष्ट उल्लेख संमतीपत्र/ करारपत्र करणे अनिवार्य राहील. किमान वेतनामध्ये दर ६ महिन्यांनंतर होणारी वाढ सदर कामगारांस देणे ठेकेदारास/ संस्थेस बंधनकारक राहील. तसेच सेवे अंतर्गत कामगारांना साप्ताहिक सुटी देणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

३. सेवा देण्यासाठी ज्या कामगारांना मंडळाकडे पाठविण्यात आलेले आहे अशा सेवे अंतर्गत कामगारांना/मनुष्यबळ यांना कोणते कामगार कायदे लागू आहेत याची शहानिशा करण्याची व त्यानुसार अंमलजावणी करण्याची जबाबदारी मुख्यतः ठेकेदाराची राहील. शासनाच्या इतर नियमाप्रमाणे पुढे वेळोवेळी निर्गमित केल्याप्रमाणे त्यातील अटी व शर्ती निविदाधारकावर बंधनकारक राहीतील किमान वेतनामध्ये वेळोवेळी शासनाकडुन होणाऱ्या बदलाप्रमाणे दरामध्ये होणारे बदल ठेकेदाराने संस्थेकडे मागणी केल्यास ती शासन निर्णयानुसार अदा करण्यात येईल.

४. ठेकेदारास कामगार सेवा ठेक्यासंबंधी व सेवे अंतर्गत कामगारांसंबंधी नियमानुसार आवश्यक ते सर्व रजिस्टर, इतर नोंदी निगमित ठेवाव्या लागतील. त्यासाठी लागणारी सर्व लेखन सामग्री ठेकेदाराने स्वखर्चाने उपलब्ध करुन घ्यावयाची आहे. संस्थेने किंवा शासनाने वेळोवेळी मागणी केल्यास सदरची माहिती रजिस्टर व इतर नोंदी ठेकेदारास संस्थेस किवा शासनास तपासणीसाठी त्वरीत उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

**ई. विमा व नुकसान भरपाई:-**

१. ठेकेदाराने पुरविलेल्या सेवेतील कामगारांना प्रचलित किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतनाची रक्कम आवश्यक ती EPF, ESIC इत्यादी कपात करुन देयक सादर करावे. सेवेतील कामगारांचे वेतन सध्या लागू असलेल्या किमान वेतन दरानुसार प्रथमतः अदा केले असल्याचे हमीपत्र करुन देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील व तसा पुरवा सादर केल्यानंतर महिन्याचे देयक अदा केले जाईल. मक्तेदारी अंतर्गत कार्यरत असलेल्या सेवेच्या बाबतीत किमान वेतनाच्या व इतर सर्व बाबतची सर्वस्वी जबाबदारी मक्तेदाराची राहील. मनुष्यबळ सेवे अंतर्गत कामगारांच्या बाबतीत काही दुखापत व अपघात झाल्यास त्याचे वैद्यकीय खर्चाची नुकसान भरपाई देणे बाबत तसेच कोणत्याही संबंधीत कायद्यामधील तरतुदीनुसार अथवा न्यायालयाच्या आदेशानुसार कोणतीही जबाबदारी निश्चीत केल्यास त्याबाबत ठेकेदाराची सर्वस्वी जबाबदारी राहील. ठेकेदाराकडील सर्व सेवे अंतर्गत कामगारांच्या संरक्षणाची जबाबदारी ही निविदाधारकाचीच राहील. तसेच एखाद्या घटनेबाबत मंडळाच्या पूर्व परवानगीने पोलीस स्थानकात सूचना देणे अथवा केस दाखल करण्याची जबाबदारी निविदाधारक ठेकेदाराचीच राहील.

२. निविदाधारक ठेकेदारामार्फत नियुक्त सेवे अंर्तगत कामगाराचा विमा हा शासकिय विमा निधी कार्यालयाकडे उतरविणे अनिवार्य राहील. सदरचा विमा ठेका कालावधी साठी असणे आवश्यक राहील. विमा उतरविल्याचा पुरावा सादर न केल्यास कंत्राटी कामाचे देयक अदा केले जाणार नाही.

३. सेवेसाठी मंडळाकडे पाठविलेल्या कामगारांच्या आरोग्य विषयक तपासणी, ठेका सुरु होण्याआधी व नंतर वर्षातून दोन वेळा करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील व तपासणी अंती आवश्यकते प्रमाणे आरोग्याची काळजी घेण्याची जबाबदारी ठेकदाराची व सदर कामगाराची राहील. वरील प्रमाणे पुरवठा मनुष्यबळ आरोग्य तपासणी अहवाल संस्थेस वेळोवेळी सादर करावा लागेल.

उ. **वादविवाद निवारण (Dispute Resolution) :-**

1. आवश्यक सेवे अंतर्गत दिलेले कामे व इतर अनुषंगिक कामे निविदाधारकाने समाधानकारकरीत्या पूर्ण केल्याचे दिसून आल्यावरुन वाद निर्माण झाल्यास कोणतीही नोटीस न देता सर्व अनामत रक्कम जप्त करुन ठेका रद्द करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई कार्यालयाचा असेल आणि याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,मुंबई यांचा निर्णय अंतीम राहील.
2. सदर निविदा सेवेचा कालावधी पुर्ण होण्यापूर्वी ठेकेदाराने ठेका सोडून दिल्यास, नंतर निविदा मागवून आलेला दर चालू ठेक्याच्या मंजूर दरापेक्षा जास्त असल्यास निविदा कालावधी मर्यादेपर्यंत होणारी फरकाची रक्कम व मंडळास नव्याने निविदा मागविण्यासाठी येणारा सर्व प्रकारचा खर्च काम अपूर्ण सोडणाऱ्या संस्था/ मक्तेदार यांचेकडून वसूल केला जाईल.

**ऊ. करारनामा व निविदा रद्द करणे बाबत:-**

1. वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास तसेच प्रचलित नियम/ अधिनियमांच्या विसंगत कृती केल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना राहील.
2. कामाच्या वेळेत ठेकेदाराचा सेवेसाठी पुरविण्यात आलेला कोणताही कामगार/ मनुष्यबळ कोणत्याही प्रकारची नशा करताना. झोपतांना, बेफीकीर वृतीने वागतांना, गैरवर्तणूक करतांना, सेवेच्या जागेवर विनापरवाना गैरहजर राहील्यास/ मान्य केलेली सेवा न दिल्यास त्याचे वेतन मंडळ देणार नाही. तसेच वरील बाब ज्या व्यक्ती संदर्भात वारंवार घडेल अशा व्यक्तीस ठेकेदाराने सेवेतून कमी करावे. या सर्व बाबींची खात्री करण्याचे अधिकार मंडळ स्वतःकडे राखून ठेवत आहे. तसेच या संदर्भात वरील सर्व प्रकार वारंवार घडल्यास पुरविण्यात आलेली सेवा रद्द करण्याचा अधिकार मंडळास राहील.

**ऋ. न्यायालयीन कार्यक्षेत्र** :-

1. निविदेदार व मंडळ यांच्या मध्ये वरील आवश्यक सेवेच्या ठेक्याबाबत कोणताही कायदेविषयक वाद उद्भवल्यास त्याबाबत दाद मागण्याकरीता "न्यायालयीन कार्यक्षेत्र मुंबई" (Subject to Mumbai Jurisdiction) राहील.
2. निविदेसंबंधी काही वाद निर्माण झाल्यास मा. सचिव, उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय मुंबई हे लवाद म्हणुन काम पाहतील व त्यांचा निर्णय बंधनकारक राहील.
3. मंडळ या शब्दाचे प्रायोजन महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ असे वाचावे.

**(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

निविदाधारकाची स्वाक्षरी
नांव
पत्ता
शिक्का
दिनांक

**MAHARASHTRA STATE KHADI & VILLAGE INDUSTRIES BOARD,**
**19/21, Manohardas Street,**
**Fort, Mumbai 400 001**
**TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)**
**022-2696808 (Fax)**

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१**

## परिशिष्ट - अ (तांत्रिक)

-:निविदा धारक विषयी माहिती:-

१. निविदा धारकाचे नांव :-------------------------------------------------------
संस्थेचे नांव:-------------------------------------------------------
पत्ता:-------------------------------------------------------
दुरध्वनी क्रमांक/ मोबाईल क्रमांक:-------------------------------------------------------
ई-मेल आयडी:-------------------------------------------------------

२. भागिदारी असल्यास भागिदाराचे नांव:-------------------------------------------------------
संस्थेचे नांव:-------------------------------------------------------
पत्ता:-------------------------------------------------------
दुरध्वनी क्रमांक/ मोबाईल क्रमांक:-------------------------------------------------------
ई-मेल आयडी:-------------------------------------------------------

१. निविदा स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीचे नांव आणि हुद्दा:-------------------------------------------------------
२. संस्थेचा प्रकार:-------------------------------------------------------
(मालक/भागीदार/प्रा.ली./सार्वजनिक उद्योग/शासकिय /शासन अंगीकृत संस्था)
३. स्थापना वर्ष आणि व्यावसायिक अनुभव (एकूण संख्या):-------------------------------------------------------
४. व्यवसाय कर नोदणी क्रमांक:-------------------------------------------------------
५. पॅन कार्ड क्रमांक:-------------------------------------------------------
६. ISO.10667-2 : 2020 प्रमाणपत्र प्रत
७. बँक खात्याचा तपशिल खाते नांव:-------------------------------------------------------
✓ खाते क्रमांक:-------------------------------------------------------
✓ बँकेचे नांव व पत्ता:-------------------------------------------------------
✓ IFSC Code:-------------------------------------------------------
✓ MICR Code:-------------------------------------------------------
८. GST नोंदणी क्रमांक :-------------------------------------------------------
९. मागील तीन वर्षात धारकावरील कोर्ट केसेसचा तपशिल :-------------------------------------------------------
१०. मागील तीन वर्षात कार्यादेश रद्दबातल झाले असल्यास त्याबाबतचा तपशिल :-------------------------------------------------------
११. निविदेवर कोणत्या अधिकारात स्वाक्षरी केली:-------------------------------------------------------
(मालक/अधिकृत भागीदार /अधिकृत प्राधिकृत व्यक्ती.

निविदा धारकाची स्वाक्षरी
(शिक्का)

**(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

MAHARASHTRA STATE KHADI &
VILLAGE INDUSTRIES BOARD,
19/21, Manohardas Street,
Fort, Mumbai 400 001
TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)
022-2696808 (Fax)

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१**

परिशिष्ट - ब (तांत्रिक)

## -: वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र:-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष (मागील ३ वर्ष) | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १. | २०२१-२०२२ | |
| २. | २०२२-२०२३ | |
| ३. | २०२३-२०२४ | |

स्वाक्षरी आणि (शिक्का)
चार्टर्ड अकोंटंट

स्वाक्षरी आणि (शिक्का)
निविदा धारका/ अधिकृत प्रतिनिधी

**(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

MAHARASHTRA STATE KHADI &
VILLAGE INDUSTRIES BOARD,
19/21, Manohardas Street,
Fort, Mumbai 400 001
TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)
022-2696808 (Fax)

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१**

परिशिष्ट-क

**-: प्रतिज्ञापत्र (मसूदा):-**

(रुपये ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत करणे आवश्यक आहे)

मी---------------------------------वय-----------राहणार---------------------

संस्थेचे नांव व पत्ता ----------------------------------------सत्य प्रतिज्ञेवर कथन करीतो की,

१. मी/आम्ही खाली सह्या करणार सत्य प्रतीज्ञेवर लिहून देतो की माझे/आमचे संस्थेतील कोणत्याही व्यक्ती सोबत कोणत्याही प्रकारची भागीदारी/शेअर किंवा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नाही.

२. मी/ आम्ही/ संस्थेने दिवाळखोरी जाहीर केलेली नाही अथवा दिवाळखोर म्हणुन घोषित झालेलो नाही.

३. मी/ आम्ही/ संस्थेने अनुचीत कामगार प्रथेचा अवलंब केलेला नाही.

४. मी/ आम्ही/ संस्थेने कोणतेही गैरकृत्य करुन किंवा नैतिक अध:पतनाचे कोणतेही कृत्य आमचेकडुन घडलेले नाही.

५. माझ्याकडुन /आमचेकडुन/संस्थेकडून/कोणतेही गुन्हेगारी कृत्य केले नाही. तसेच उक्त कृत्यांसाठी मी/आम्ही/आमच्या संस्थेविरुध्द कोणत्याही न्यायालयात दावा दाखल झालेला नाही.

६. मी/आम्ही/संस्थेने आयकर /विक्रीकर /जीएसटी/व्यवसाय कर व फेरा इ. कायद्याचे उल्लंघन केलेले नाही. त्याबाबत माझ्या आमच्या संस्थेविरुध्द खटला किंवा दावा दाखल झालेला नाही.

७. मला/आम्हाला/संस्थेला शासकीय/स्थानिक संस्था किंवा महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांनी काळ्या यादीत टाकलेले नाही.

८. मला/आम्हाला -------------------------या संस्थेने / /२० ते / /२० या कालावधीसाठी काळ्या यादीत टाकले होते, सदर कालावधी संपलेला असल्याने मी/माझी संस्था निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास पात्र आहे.

९. मला/ आम्हाला सेवेच्या स्वरुप व व्याप्ती मध्ये दिल्याप्रमाणे तसेच करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे सेवेचा दर्जा चांगला नसल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव मक्ता रद्द केल्यास मी/ आम्ही सदर ठिकाणी पूरविलेल्या आवश्यक सेवेसाठी, व इतर कामासाठी केलल्या खर्चाची मागणी करणार नाही.

१०. पात्रते बाबतचे दाखल केलेले कागदपत्र सर्व खरे आहेत. त्यात काही फसवेगिरी आढळून आल्यास किंवा तसे करार काळात आढळून आल्यास मी/ आम्ही त्यासाठी जवाबदार राहू व अपात्र ठरु व मी/ आम्ही अशा परिस्थीतीत कोणतीही नोटीस न देता पुरविण्यात आलेली सेवा रद्द करण्याचा अधिकार मंडळास राहील. तसेच मी निविदेसोबत जमा केलेली बयाणा रक्कम व मंडळाकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा मंडळास अधिकार राहील व ते मला मान्य राहील.

प्रतिस्वाक्षरीकृत

निविदा धारकाची सही-----------------
निविदा धारकाचे नांव------------------
पत्ता---------------------------------
दुरध्वनी क्र-------------------------
मोबाईल क्रमांक-----------------------
दिनांक-------------------------------

शिक्का
(पब्लीक नोटरी/एक्झीक्युटीव्ह मेजीस्ट्रेट)
(अनिवार्य)

**(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

# परिशिष्ट-ड

## -: सेवेचे स्वरुप, शैक्षणिक पात्रता इ.

मंडळाच्या मुख्य कार्यालय व जिल्हा कार्यालयीन कामकाजासाठी बाहय यंत्रणेद्वारे प्राप्त होणा-या 77 कर्मचारी यांचे कामाचे ठिकाण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | प्रसिध्दी सहायक | सहायक तथा टंकलेखक | पर्यवेक्षक उद्योग | मधुक्षेत्रीक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुख्य कार्यालय | 1 | 6 | 6 | -- |
| 2 | ठाणे | -- | 1 | 1 | -- |
| 3 | पालघर | -- | -- | 2 | 1 |
| 4 | रायगड | -- | 1 | 1 | 1 |
| 5 | रत्नागीरी | -- | 1च | 1 | 1 |
| 6 | सिंधुदूर्ग | -- | 1 | 1 | -- |
| 7 | नाशिक | -- | 1 | -- | -- |
| 8 | धुळे | -- | 1 | 1 | 1 |
| 9 | नंदुरबार | -- | 1 | -- | 1 |
| 10 | जळगाव | -- | 1 | -- | -- |
| 11 | अहमदनगर | -- | -- | 1 | 1 |
| 12 | पुणे | -- | 1 | 1 | -- |
| 13 | सातारा | -- | -- | -- | 1 |
| 14 | सांगली | -- | -- | -- | 1 |
| 15 | सोलापूर | -- | 1 | -- | -- |
| 16 | कोल्हापूर | -- | 1 | -- | -- |
| 17 | छ.संभाजीनगर | -- | -- | 1 | 1 |
| 18 | जालना | -- | 1 | 1 | 1 |
| 19 | धाराशिव | -- | -- | 1 | 1 |
| 20 | परभणी | -- | 1 | -- | -- |
| 21 | हिंगोली | -- | -- | 1 | -- |
| 22 | बीड | -- | 1 | 1 | 1 |
| 23 | नांदेड | -- | 1 | -- | 1 |
| 24 | लातूर | -- | -- | -- | 1 |
| 25 | बुलढाणा | -- | 1 | 1 | -- |
| 26 | अकोला | -- | -- | 1 | -- |
| 27 | वाशिम | -- | 1 | 1 | -- |
| 28 | अमरावती | -- | -- | -- | -- |
| 29 | यवतमाळ | -- | -- | -- | -- |
| 30 | वर्धा | -- | 1 | -- | -- |
| 31 | नागपूर | -- | -- | -- | 1 |
| 32 | भंडारा | -- | -- | 1 | 1 |
| 33 | गोदीया | -- | 1 | 1 | 1 |
| 34 | चंद्रपूर | -- | 1 | -- | -- |
| 35 | गडचिरोली | -- | 1 | 1 | 1 |
| 36 | हातकागद संस्था, पुणे | -- | 1 | 1 | -- |
| 37 | मध संचालनालय, महाबळेश्वर | -- | -- | -- | 3 |
| | | 1 | 28 | 27 | 21 |

| बाहययंत्रनेद्वारे पुरवठा करावयाच्या मनुष्यबळासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, वय व अनुभव याबाबत तपशील | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशील | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | वय | अनुभव |
| 1 | प्रसिध्दी सहायक | 01 | ✓ मराठी हा मुख्य विषय घेवून पदवी परीक्षा उत्तीर्ण<br>✓ जाहीरात व पदविका असल्यास प्राधान्य | 18 ते 43 | पत्रकारीता व जन संज्ञापन मधील पदविका वृत्तपत्र व्यवसायातील प्रसिध्दीच्या कामाचा दोन वर्षाचा अनुभव |
| 2 | कनिष्ठ सहायक | 28 | ✓ मान्यता प्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेची पदवी किंवा शासनाने समतुल्य असल्याचे घोषित केलेली अन्य कोणतीही शैक्षणिक अर्हता<br>✓ इंग्रजी टंकलेखन प्रति मिनिट 40 शब्द व मराठी टंकलेखन प्रति मिनिट 30 शब्द कमी नसेल इतक्या वेग मर्यादेचे, शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखन प्रमाणपत्र<br>✓ संगणकातील प्राथमिक ज्ञान आवश्यक (MSCIT) | 18 ते 43 | शासकीय, निमशासकीय कार्यालयात/स्थानिक संस्था या ठिकाणाचा सबंधीत कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| 3 | उद्योग पर्यवेक्षक | 27 | ✓ मान्यता प्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेची पदवी किंवा शासनाने समतुल्य असल्याचे घोषित केलेली अन्य कोणतीही शैक्षणिक अर्हता. तसेच क्षेत्रीय कामाचा अनुभव. | 18 ते 43 | औद्योगिक क्षेत्रात, शासकीय, निमशासकीय क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्यास प्राऽधान्य. |
| 4 | मधुक्षेत्रिक | 21 | ✓ कृषी पदविका/बीएससी/ एमएससी (जीवशास्त्र) असल्यास प्राधान्य.<br>✓ संगणकातील प्राथमिक ज्ञान आवश्यक (MSCIT) | 18 ते 43 | सदर क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| | | 77 | | | |

निविदाधारकाची स्वाक्षरी
नाव
पत्ता

**(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,
मुंबई

MAHARASHTRA STATE KHADI &
VILLAGE INDUSTRIES BOARD,
19/21, Manohardas Street,
Fort, Mumbai 400 001
TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)
022-2696808 (Fax)

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१**

परिशिष्ट-इ

-: दाखला :-

(रुपये ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत करणे आवश्यक आहे)

प्रमाणित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई (यापुढे मंडळ असा उल्लेख आहे) यांनी आवश्यक सेवा पुरवठा सेवेविषयी घालून दिलेल्या अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असून मला/ आम्हाला हा ठेका मिळाल्यास निविदेतील व करारातील अटी व शर्तींची पूर्तता करण्याची जबाबदारी माझ्यावर/ आमच्यावर असून त्या माझ्यावर/आमच्यावर बंधनकारक राहतील. वरील अटी व शर्तींचा जर माझ्या/ आमच्याकडून भंग झाला तर माझी/ आमची अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार संस्थेस राहिल. तसेच त्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देखील करण्यास मी/ आम्ही जबाबदार असु. तसेच ठेक्याच्या कालावधीत सेवे अंतर्गत कामगारांकडून मंडळाच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाल्यास किंवा तसे ठेक्याचा कालावधी संपल्यानंतर लक्षात आल्यास तसेच शासकीय नियमांचे/ कायद्यांचे पालन न झाल्यास त्याची भरपाई करण्याची जबाबदारी माझी / आमची राहील.

प्रतिस्वाक्षरीकृत

शिक्का
(पब्लीक नोटरी/एक्झीक्युटीव्ह मेजीस्ट्रेट)
(अनिवार्य)

निविदा धारकाची सही---------------------
निविदा धारकाचे नांव----------------------
पत्ता-----------------------------------
दुरध्वनी क्र-------------------------------
मोबाईल क्रमांक-------------------------
दिनांक----------------------------------

**(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

# परिशिष्ट:-फ

## शपथ पत्र

(मंजुरीकृत निविदाधारकाने कार्यादेश प्राप्तीनंतर प्रत्येक देयकासोबत सादर करणे अनिवार्य राहील)

मी--------------(संस्थेचे नाव) तर्फे प्रोप्रायटर श्री---------------(संपुर्ण नाव) वय-----धंदा-व्यवसाय, रा--------ता.-----जि.-------आज रोजी वरील संस्थेचा प्रोप्रायटर असुन वरील संस्थेतर्फे मला प्राप्ता झालेल्या अधिकाराच्ये सत्याप्रतीज्ञेवर खालील प्रमाणेचे शपथपत्र लिहुन देतो ते येणेप्रमाणे-

१. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई, (यापुढे मंडळ असा उल्लेख आहे) यांनी दैनिक वृत्तपत्र ------ दि. ------मध्ये प्रसिध्द् केलेली निविदा क्र.-----------अन्वये आमच्या संस्थेने भरलेली निविदा विचारात घेवून, संस्थेचे जा.क्र.-------------दिनांक------------च्या कार्यादेशानुसार दिनांक----------- ते दिनांक------------- या कालावधीसाठी The Contract Labour (Reguitton & Abolition) Act १९७० च्या तरतुदीनुसार, कंत्राटी सेवा अंतर्गत आवश्यक त्या पुरविण्यासाठी आम्हाला देण्यात आलेला असुन तो आम्ही दिनांक------------ पासून स्विकारलेला असून त्याअनुषंगाने वर उल्लेखीत निविदा, कार्यालयीन आदेश आणि त्या अनुषंगाने संस्थेशी आम्ही करुन दिलेल्या करारातील अटी व शर्तीच्या अधीन राहून व त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे सेवा आजतागायत पुरवित आहोत.

२. आज रोजी वरील सेवा पूरवित असतांना आमच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सेवकांचे वेतन अदायगी करिताचे माहे ---------------चे वेतनपत्रक आम्ही दिनांक-------- रोजी सादर केलेले असून सदरच्या वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना आम्ही माहे------------करीताचे वेतन हे किमान वेतन कायद्यानुसार आमच्या संस्थेचे ------------या बँकेत खाते क्र.-------------वरुन त्यांना देय असलेली रक्कम प्रथमतः त्यांच्या------------ या बँकेच्या खात्यावर वर्ग केलेली आहे. सदरचे वेतन हे कार्यादेशामध्ये नमुद केल्याप्रमाणे असुन त्या वेतनापोटी अदा केलेल्या रकमेमध्ये सेवा देणाऱ्या कामगारांना नियमानुसार देय असलेली अंशदान भविष्य निर्वाह निधीची रक्कम आमच्या संस्थेच्या देय असलेल्या रकमेसह त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे. तसेच करारातील अटीप्रमाणे सेवा अंतर्गत कामगार अपघात नुकसान भरपाई, किमान वेतन कायदा, उपदानाची रक्कम व्यवसाय कर, ईएसआय यासह सदरच्या कर्मचाऱ्यांना कायद्यानुसार देय असलेली सर्व रक्कम आम्ही त्यांना करारातील अटी व शर्ती नुसार व कायदेशीर तरतुदीप्रमाणे अदा केलेली आहे. त्याबाबत कोणत्याही सेवा अंतर्गत कामगाराची तक्रार आमच्याकडे नाही. भविष्यात आमच्या आस्थापनेवरील सदरची सेवा पुरविणाऱ्या कामगारांच्या वेतनाबाबत कोणतीही तक्रार आल्यास किंवा विवाद उपस्थित झाल्यास त्याबाबतचे निराकरण करणे व त्या अन्वये देय असलेल्या रक्कम अदा करण्याची संपूर्ण जबाबदारी ही आमची व्यक्तीशः राहील. त्याचा मंडळाच्या प्रशासनाशी कोणताही संबंध नसेल किवा संस्था त्यास मंडळ जबाबदार राहणार नाही. आम्ही कामगार कायद्यानुसार कर्मचाऱ्यांना देय असलेले सर्व सेवा सवलती फायदे नियमानुसार अदा करेल. तसेच सदरच्या बिलामध्ये नमुद केलेल्या सेवा अंतर्गत असणाऱ्या कामगारांची हजेरी व आम्ही दाखल केलेले दस्तऐवज खरे व वैध असून कोणतीही माहिती बनावट किंवा खोटी सादर केलेली नाही. बोनस कायदा हा संस्थेस लागू नसून बोनस हा संबंधीत कंत्राटी कर्मचाऱ्यांना अदा करण्याचे मंडळास बंधन नाही. परंतू सदरची बोनसची रक्कम ही माझ्या आस्थापनेवर असलेल्या कामगारांना देणे बंधनकारक राहील. सदर तरतुदींचे उल्लंघन झाल्यास देय असलेली रक्कम माझ्या कडून वसूल करण्यात येईल हे मला ज्ञात आहे.

३. सदर देयका संबंधित खालील दस्तऐवज आवश्यक असून ते आमच्या दप्तरी मुळ स्वरुपात आहेत.

१. लेबर लायसेन्स
२. विमा पॉलीसी आणि
३. शॉप ॲक्ट नोंदणी क्रमांक

वरील शपथपत्राव्दारे आम्ही संस्थेच्या प्रशासनास कळवतो की, वर उल्लेखीत निविदा कार्यादेश आणि करारानुसार कार्यवही करण्यात आली असुन त्याबाबत कोणतीही त्रृटी नसून सदरच्या बिलाच्या अंकेक्षण (Audit) करण्याचे अधिन राहून वेतन अदायगी व्हावी, येणेप्रमाणे शपथपत्र लिहून दिले असे.

हमीपत्र
करणार
संस्थेचे नाव

**(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

MAHARASHTRA STATE KHADI &
VILLAGE INDUSTRIES BOARD,
19/21, Manohardas Street,
Fort, Mumbai 400 001
TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)
022-2696808 (Fax)

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१**

## प्रतिज्ञा

१. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई (यापुढे मंडळ असा उल्लेख आहे.) यांस आवश्यक सेवेअंतर्गत कार्यरत कामगारांना कोणते दर लागु आहेत, याची शहानिशा करुन दर भरण्याची जबाबदारी माझी आहे. कामगार कायद्यानुसार तसेच शासकिय नियमानुसार जे काही सेवे अंतर्गत असलेल्या कामगारांना ठेकेदाराकडुन देय असते ते सर्व वेतन, भत्ते, इतर सवलती या समान असतात. त्याबाबतीत कोणतीही मतभिन्नता नसते म्हणुन ठेका कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक त्या सर्व बाबींचा विचार करुन केवळ निव्वळ सर्विस चार्जेस हा मापदंड गृहित धरुन निविदा धारकांकडून सर्विस चार्जेसच्या टक्केवारीच्या स्वरुपांत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत, हे मला ज्ञात आहे. त्यानुसार मी निविदा सादर केली असून घटकनिहाय तपशिल दर्शविणारा तक्ता परिशिष्ट ग (BOQ) अन्वये सादर करीत आहे. BOQ मधील तक्त्यातील दराशिवाय ठेकेदार म्हणून सेवा अंतर्गत असलेल्या कामगारांना इतर सेवा सवलतींच्या बाबतीत मोबदला देण्यास मी बांधील/उत्तरदायी असुन त्याबाबत निर्णय होणऱ्या सर्व कायदेविषयक बाबींसाठी संस्थेचा मालक म्हणुन मी व्यक्तीश: जबाबदार राहील. या सर्व बाबींचा विचार करुनच मी सर्विस चार्जेसचे निव्वळ दर नमूद केले असून त्यावरील कर स्वतंत्र दर्शविलेले आहे. सदरच्या सेवा शुल्कातुन याबाबतची प्रतिपूर्वी मला करता येणे शक्य असुन त्याबाबत मी संस्थेकडुन अतिरीक्तची मागणी करणार नाही असे अभिवचन देतो.

२. मंडळास बोनस कायदा लागु असल्यास बोनसची रक्कम अदा करण्याचा निर्णय घेणे बंधनकारक आहे, हे मला ज्ञात आहे.

३. एकुण मासिक वेतनात समाविष्ट भविष्य निर्वाह निधिची रक्कम शासन खती व संबंधित सेवा देणाऱ्या कामगारांच्या अधिकृत बँक खात्यात जमा करणे व कर्मचारी संख्यनुरुप मासिक समरी PF CHALLAN, ECR इत्यादी ची प्रत बीला सोबत सादर करणे माझ्यावर बंधकारक आहे.

४. सर्व सेवा अंतर्गत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी WC Policy ची रक्कम जमा केल्यानंतर त्याची प्रतिपूर्ती संस्थेकडुन आहे हे मला ज्ञात आहे.

५. मी/ आम्ही पुरविलेल्या सेवा अंतर्गत कामगारांना प्रचलित किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतनाची रक्कम आवश्यक ती EPF/ESIC इ.कपात दर्शवुनच तसेच ज्या सेवा अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या नावावर रक्कम जमा केल्या आहेत, त्यांची यादी देयकासोबत सादर करणे बंधनकारक आहे हे मला ज्ञात आहे.

६. महाराष्ट्र किमान धरभाडे भत्ता अधिनियमान्वये ५० पेक्षा कमी मनुष्यबळ असणाऱ्या संस्थेस घरभाडे भत्ता (HRA) लागू नाही याची मला जाणीव आहे.

७. मंडळाच्या प्रशासनाच्या पूर्व मंजुरीने केलेल्या डयूटीजची संख्या संबंधित महिन्यातील निर्धारीत दिवसांपेक्षा जास्त झाल्यास जास्तीच्या कालावधीसाठी किमान वेतन कायद्याप्रमाणे दर परिगणित करुन वेतन अदायगी करणे बंधनकारका राहील हे मला ज्ञात आहे.

८. निविदेतील सर्व अटी शर्तींची मी नोंद घेतली असून, शासकीय कायद्यातील सर्व नियम व विशेष अटी शर्तीसह तसेच निविदा मंजूर करते वेळी संस्थेच्या प्रशासनाने सुचविलेल्या अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत व राहतील.

९. मी/ आम्ही निविदा माहितीपत्रक पूर्णपणे वाचली असून यातील सेवेचे स्वरुप पुरवठा करण्यात येणारी सेवा व त्यासाठी लागणारे साहित्य (मटेरियल) पुरवठा करण्यासाठी बांधील आहे. (साफसफाईचे मटेरीयल सोडून)

१०. निविदेतील अटी / शर्ती माझ्यावर बंधनकारक असून त्यांचे उल्लंघन झाल्यास मला अपात्र ठरविण्याचा अधिकार संस्थेस राहील.

११. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी परिशिष्ट ग मधिल आवश्यक सेवा पुरविणेसाठी दरपत्रक सोबत सादर करीत आहे.

१२. टक्केवारीनुसार सर्व्हीस चार्जेसचे दर नमूद करतांना प्रदानास देय असणारी सर्व्हीस चार्जेसची मासिक रक्कम पूर्ण रुपयांत येईल याची खात्री करुनच दर नमुद करणे आवश्यक राहील याची मला जाणीव आहे.

## प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो की, BOQ मध्ये नमुद दर इतर संस्था/विभाग/संघटनांना आकारण्यात आलेल्या दरापेक्षा जास्त नाहीत.

निविदा धारकाची सही---------------------
निविदा धारकाचे नांव व हुदा---------------
पत्ता-------------------------------------
दुरध्वनी क्रमांक-------------------------

**(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

MAHARASHTRA STATE KHADI &
VILLAGE INDUSTRIES BOARD,
19/21, Manohardas Street,
Fort, Mumbai 400 001
TEL: Office: 022- 22617641-2-3 (G)
022-2696808 (Fax)

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास रस्ता फोर्ट, मुंबई -०१**

**परिशिष्ट:-ग** (आर्थिक)

Bill of Quantity (BOQ)

| अ.क्र | पदाचे नाव | मासिक मानधन सर्व कपातीसह जीएसटी वगळून | मासिक मानधन टक्केवारीनुसार सर्व्हिस चार्जेस/सेवा आकार |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | प्रसिध्दी सहायक | रुपये -२७,९००/- प्रत्येकी | |
| २ | सहायक तथा टंकलेखक | रुपये -२७,९००/- प्रत्येकी | |
| ३ | पर्यवेक्षक उद्योग | रुपये -२७,९००/- प्रत्येकी | |
| ४ | मधुक्षेत्रिक | रुपये -२७,९००/- प्रत्येकी | |

निविदा धारकाची सही------------------------------
निविदा धारकाचे नांव व हुद्दा--------------------
पत्ता--------------------------------------
दुरध्वनी क्रमांक--------------------------------

**(गीतांजली बाविस्कर, भाप्रसे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई